प्र. मु. व. सं. महा. राज्य
नागपूर-४४० ००६.
2988
आवक क्रमांक

शासन स्तरावरुन प्राप्त होणा-या विनंती अर्ज / तक्रार अर्जावर संबंधित वनवृत्त अधिकारी स्तरावरुन कार्यवाही करुन संबंधितांना पत्राद्वारे कार्यवाहीची माहिती करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :टिआरएस-०८/२००५/प्र.क्र.३३५/फ-६
मंत्रालय,मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २००५.

CF (HRD)

PCCF

**परिपत्रक :-**

आपणांस विदित आहे की, अवैध वृक्षतोडीच्या अनुषंगाने फार मोठयाप्रमाणात विधानमंडळ कामकाज प्राप्त होत असते. त्यातील तारांकित प्रश्नांचे अवलोकन केले तर त्यामध्ये अवैध वृक्षतोडीबाबत वेळोवेळी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आधारीत असलेले तारांकित प्रश्न प्राप्त होत असतात. हे तक्रार अर्ज प्रामुख्याने राजकीय संघटना,सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नगरपरिषदा, नगरपालिका यांचेबरोबरच आमदार,खासदार यांचेकडूनही प्रामुख्याने प्राप्त झालेले असतात. शासनस्तरावर जेव्हा असे अर्ज / तक्रार अर्ज प्राप्त होतात, ते अर्ज प्रधान मुख्य वनसरंक्षक,महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविले जातात. तथापि क्षेत्रीय अधिका-यांकडून सदर निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली, याचा अहवाल शासनास दिला जात नाही, अथवा अर्जदारांनाही दिला जात नाही. त्यामुळे संबंधित अर्जदार त्याने केलेल्या अर्जाबाबत नेमकी काय कार्यवाही केली, जात आहे याबाबत अनभिज्ञ राहतो व कार्यवाहीची माहिती मिळविण्यासाठी लोकप्रतिनिधींमार्फत तारांकित प्रश्न विचारण्याचा मार्ग अनुसरतो असे दिसून येते. त्यामुळे फार मोठयाप्रमाणावर तारांकित प्रश्न हाताळण्यास भाग पडते. हे टाळणे सहज शक्य आहे, त्यासाठी असे कळविण्यात येत आहे की, शासन स्तरावरुन क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठविण्यात आलेले निवेदन,तक्रार अर्ज यांचेवर वनवृत्तनिहाय चौकशी इत्यादिची कार्यवाही होणे आवश्यक असून केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती संबंधित वनवृत्ताच्या स्तरावरुन परस्पर अर्जदारांना पत्राद्वारे देणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदारांनी केलेल्या तक्रारी, विनंती अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना प्राप्त होईल व आपल्या अर्जाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली गेली याची माहिती मिळविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत तारांकित प्रश्न/अतारांकित प्रश्न इत्यादि उपस्थित करण्याची आवश्यकता कमी होईल. त्या अनुषंगाने शासन स्तरावरील विधानमंडळ विषयक कामकाजामध्ये घट करता येणे शक्य होईल.सबब, त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना सूचना देण्यात येत आहेत, तसेच त्रैमासिक अहवालामध्ये देखील त्याचा समावेश करण्यात यावा. त्यामध्ये शासन स्तरावरुन प्रत्येक वनवृत्तनिहाय किती निवेदने प्राप्त झाली, किती प्रकरणांबाबत चौकशी केली ? किती प्रकरणात चौकशी प्रलंबित आहे ? किती प्रकरणांत चौकशी पूर्ण करुन अर्जदारांना उत्तर देण्यात आले ? व किती प्रकरणे त्रैमासिकनिहाय प्रलंबित आहेत ? याची संख्या पुढील त्रैमासिक अहवालात देण्यात यावी.

सदर आदेशांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(आ.वि.आष्टेकर)
सहसचिव
महसूल व वन विभाग

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक,महाराष्ट्र राज्य,नागपूर
२. मुख्य वनसंरक्षक सर्व

Govt. Circular